गुरुवार, दि. ३० ऑक्टोबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ६८ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# पत्रकार विष्णु कदम मारहाण प्रकरणात पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची पीसीएमची मागणी

**जालना । प्रतिनिधी -** येथील पत्रकार विष्णू कदम यांना बातमी प्रसिद्धीचा राग मना धररुन राम सावंत, हर्षवर्धन सावंत, राम कुराडे व इतर चार-पाच जणांनी मारहाण केली. श्री कदम यांनी याबाबत रितसर कदीम जालना पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर आजपावेतो गुन्हा दाखल करण्यात आला नसल्याने प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके व पदाधिकारी तसेच पत्रकारांनी अपर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी यांची भेट घेऊन विषयाचे गांभीर्य लक्षात आणून दिले व मारहाण करणाऱ्या दोषींवर तात्काळ पत्रकार संरक्षण कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली आहे. यावर श्री नोपाणी यांनी सकारात्म क प्रतिसाद देत कदीम जालना पोलीस निरीक्षकांना यासंदर्भात चौकशी करुन गुन्हा दाखल करण्याचे निर्दे श देणार असल्याचे आश्वासन प्रेस कॉन्सील महाराष्ट्र जालना जिल्हा पदाधिकाऱ्यांना दिले आहे.

यासंदर्भात दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, विश्वक्रांती मराठवाडा या वृत्तपत्राचे संपादक विष्णू कदम यांना बातमी प्रसिद्ध केल्याचा राग मनात धरून राम सावंत, हर्षवर्धन सावंत, राम कुराडे व ईतर चार-पाच जणांनी लाथा बुक्क्याने म ारहाण करुन जीव मारण्याची धमकी दिली. ही घटना दि २० ऑक्टोबर २०२५ रोजी रात्री १० ते साडे दहा वाजेच्या सुमारास मस्तगड येथील पोलीस चौकी जवळ मारहाण केली. सदरील घटनेचा जालना जिल्ह्यातील पत्रकार निषेध व्यक्त करताहेत. विष्णु कदम यांना झालेल्या मारहाणीनंतर कदम यांना तातडीने शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. दि. २० ऑक्टोबर रोजी रात्री उशिरा यासंदर्भात कदीम जालना पोलीस ठाण्यात विष्णू कदम यांनी रितसर तक्रार दाखल केलेली आहे. मात्र, आजपावेतो कोणत्याही स्वरुपाचा गुन्हा पोलीसांनी दाखल केलेला नाही. कदम यांना मारहाण करणाऱ्या व्यक्ती ह्या राजकीय आहेत. त्यांनी राजकीय ताकद वापरुन अथवा ईतर आर्थिक मार्गाने प्रकरण दाबण्याचा प्रयत्न केला असल्याचे दिसून येते आहे. मे. साहेबांना विनंती आहे की, सदरील प्रकरणात पत्रकार विष्णु कदम यांना घटनेच्या अनुषंगाने त्या दिवशी आलेले फोन कॉल रेकॉर्ड चेक करण्यात यावेत. मस्तगड भागातील पोलीस चौकी समोर घटना घडली आहे. त्या परिसरातील सीसीटिव्ही फुटेज तपासण्यात यावेत. व निष्पक्ष चौकशी करुन दोषी असलेल्या राम सावंत, हर्षवर्धन सावंत, राम कुराडे व इतर चार ते पाच जणांवर पत्रकार संरक्षण कायद्यातंर्गत गुन्हा दाखल करावा.



तसेच सोशल मिडीयाच्या माध्यमातून राम कुराडे यांनी स्वतः मारहाण केल्याचे मान्य केले आहे. एका पोस्ट द्वारे राम कुराडे यांनी पत्रकार विष्णू कदम याच्याबद्दल अपशब्द देखील वापरले आहे. वरिल सर्व बाबींचा निष्पक्ष आणि सविस्तर तपास करुन योग्य ती कारवाई करण्यात यावी. अशी मागणी पीसीएम च्यावतीने करण्यात आली.

निवेदनावर पीसीएमचे जिल्हाध्यक्ष दीपक शेळके, विष्णु कदम, सुहास वैद्य, भरत मानकर, ओमप्रकाश शिंदे, संतोष भुतेकर, शेख ईलियास अब्बास, आमेर खान, निकीता काळे, अशफाक पटेल, सुनील नरवडे, शेख शकील, संदीप भाकरे, दिनेश नंद, अतुल पडुल, बासित बेग, शेख सलीम, शेख मुजिबोद्दीन यांच्यासह पत्रकारांच्या सह्या आहेत.

## पोलीस ठाण्याच्या पाकीट वाटपाला अपर पोलीस अधिक्षकांची मुक संमती!

प्रेस कॉन्सील ऑफ महाराष्ट्र जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांच्यासह पत्रकारांनी श्री कदम यांना झालेल्या म ारहाणीसंदर्भात गुन्हा दाखल करण्याच्या मागणीसाठी अपर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी यांची भेट घेतली. यावेळी दीपक शेळके यांनी सदर बाजार पोलीस ठाणे व चंदनझिरा पोलीस ठाणे येथून जाहिरातींऐवजी पत्रकार व संपादकांना पाकीट पद्धतीने हजार, दोन हजार रुपये देण्यात आल्याचे निदर्शनास आणून दिले. शासनमान्य जाहीरात यादीत सामाविष्ट वृत्तपत्रे, अधिस्विकृती धारक पत्रकार तसेच पीआरजीआयचे प्रमाणपत्र, बॉडकास्टिंग मिनिस्ट्रीची परवानगी असलेले अधिकृत इलेक्ट्रॉनिक मिडियाचे पत्रकार यातील अनेकांना डावलून सरसकट जो पत्रकार म्हणून जाईल त्यास हजार रुपये, दोन हजार रुपये, कुणाला अधिकची रक्कम अशा पद्धतीने पाकीटे सदर बाजार पोलीस ठाण्यात श्री ढाकणे व चंदनझिरा पोलीस ठाण्यात श्री देशमुख यांनी वाटप केल्याचे निदर्शनास आणून दिले. यावर अपर पोलीस अधिक्षक आयुष नोपाणी यांनी पोलीसांकडे जाहीरातीसाठी फंड आमच्याकडे नसतो त्याच बरोबर पत्रकारांची संख्या वाढली असल्याने असे घडले असावे असे उत्तर देत एकप्रकारे या सर्व अनाधिकृत प्रकाराला मुक संमती असल्याचे दाखवत अधिक बोलणे टाळले असल्याने पत्रकारांनी नाराजी व्यक्त केली आहे. या संदर्भात वरिष्ठ पातळीवर पाठपुरावा करण्यात येणार असल्याचे प्रेस कॉन्सीलचे जालना जिल्हाध्यक्ष दीपक शेळके यांनी यावेळी माध्यमांशी बोलतांना सांगितले आहे.

युवा आदर्श

ट्युशन ...

प्रायव्हेट कोचिंग फॅड
एक नवीन मनस्ताप
कमी पडे टक्के जेंव्हा
उगाचं करी पश्चात्ताप
यश अपयश लढ्यात
जीव भरडतो निष्पाप
जीव घेण्या स्पर्धा युध्दा
बळी चालला अश्राप
किती कारनामे उघड
कोचिंग क्लास प्रताप
नाईलाजे प्रवेश घेती
मनात दाबला संताप
शिके शास्त्रोक्त कॉपी
होई गुन्हे सगळे माफ
अवजड फी भरताना
भले हैराण माय बाप
जागे व्हावे पालकांनी
पुसावा हा अभिशाप
बॅन कराव्या ट्युशन्स
स्वताच शोधा उःशाप
सगळे छात्र न अव्वल
अपेक्षा नको अडमाप
टक्क्यांची टक्कर सरे
तेंव्हा पुसेल अभिशाप
शाळे शिके मन:पूर्वक
प्रश्न सुटती आपोआप
कडक राबवा कायदा
रे असेलं कुणाची टाप

हेमंत मुसरीफ पुणे
9730306996.

अब्दुल रशीद यांच्या असंख्य कार्यकर्त्यांचा प्रवेश; घोगरे स्टेडियमवर रंगला प्रवेश सोहळा

# जालना महानगरपालिकेवर काँग्रेसचा महापौर दिसेल

### प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी व्यक्त केला विश्वास

**जालना । प्रतिनिधी -** काँग्रेस पक्षाला मोठी ताकद मिळाली असून अब्दुल रशीद यांच्या असंख्य कार्यकर्त्यांनी बुधवार (दि २९) रोजी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. जुना जालन्यातील घोगरे स्टेडीयम येथे हा प्रवेश सोहळा रंगला. या सोहळ्यानंतर जिल्ह्यातील राजकीय समीकरणांमध्ये चांगलाच बदल घडण्याची चिन्हे दिसत आहेत.

या कार्यक्रमाला काँग्रेस प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ, खासदार डॉ. कल्याण काळे, जिल्हा निरीक्षक अशोक पाटील निलंगेकर, जिल्हाध्यक्ष राजाभाऊ देशम ुख, अब्दुल रशीद, राजेंद्र राख, कल्याण दळे, बदर चाऊस, शहराध्यक्ष अतिक खान, संजय मुथा, ॲड. अकरम सय्यद, किरण पाटिल डोनगांवकर, यूसुफ शेख, अब्दुल रऊफ, अनवर देशमुख, वसीम, खलील शेख, विनोद यादव यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.





यावेळी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी म्हटले की, रशीद या नावाचा अर्थ समजदार, निष्ठावान आणि संयमी असा आहे. अब्दुल रशीद यांनी पक्षात प्रवेश करून काँग्रेसला एक मजबूत आधार दिला आहे. लवकरच जालना महानगरपालिकेवर काँग्रेसचा महापौर दिसेल, याचा विश्वास मला आहे. माजी आमदारांवर नाव न घेता टीका करत म्हटले की, जालन्यात चॉकलेट वाटणारा माजी आमदार पक्षातून गेला, आणि त्याच्याबरोबर पक्षाचे पणौती गेली. मात्र आज पक्ष प्रवेशानंतर काँग्रेसमध्ये मोठी भर पडली आहे. राज्यातील विविध जिल्ह्यांत काँग्रेस प्रवेश सोहळे जोमात होत आहेत.

खासदार डॉ. कल्याण काळे यांनी माजी आमदारांवर कठोर टीका करत म्हटले की, माजी आमदारांचा मनमानी स्वभावच काँग्रेससाठी अडथळा ठरला होता. ते स्वतःला केंद्रबिंदू मानत. मी सांगेल तेच होईल, अन्यथा काही होऊ देणार नाही, अशी त्यांची भूमिका होती. मात्र अब्दुल रशीद आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या प्रवेशामुळे आता पक्षात नवी ऊर्जा आली आहे. येणारा काळ हा काँग्रेसचा असेल.

### हा प्रवेश सोहळा काँग्रेससाठी टर्निंग पॉईंट ठरणार; जनताच काँग्रेसचा महापौर करेल - अब्दुल रशीद

कार्यक्रमात काँग्रेसचा झेंडा हातात घेताना अब्दुल रशीद यांनी कार्यकर्त्यांना उद्देशून सांगितले की, जालन्याच्या जनतेचा विश्वास जिंकण्यासाठी आम्ही रस्त्यावर उतरू. काँग्रेस पुन्हा एकदा जनतेच्या मनात पान २ वर

जिल्हाधिकारी आशिमा मित्तल ॲक्शन मोडवर

# वाळुची अवैध वाहतुक करणाऱ्या तस्करांना तडीपार करण्याचे निर्देश

**जालना । प्रतिनिधी -** महसूल व पोलिस प्रशासनाने अवैध वाळु चोरी विरोधात संयुक्त कारवाई करावी. प्रत्येक तालुक्यातील अवैध वाळु वाहतुक असलेली ठिकाणे तहसीलदार व पोलिस विभागाने निश्चित करावे. अशा ठिकाणी सीसीटिव्ही लावण्याची कारवाई करण्यात यावी. तरी जिल्ह्यातील वाळुची अवैध वाहतुक करणाऱ्या तस्करांना तडीपार करावे, असे निर्देश जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिले.

जिल्हाधिकारी कार्यालयात अवैध वाळु उपसा रोखण्यासाठी विशेष बैठक पार पडली, यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, प्र.अपर जिल्हाधिकारी सरिता सुत्रावे, प्र.निवासी उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, जिल्हा खनिकर्म अधिकारी तुषार निकम यांच्यासह जिल्ह्यातील उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलिस अधिकारी, तहसीलदार आदि प्रमुख उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल म्हणाल्या की, जिल्ह्यातील वाळुची अवैध वाहतूक रोखण्यासाठी ड्रोनचा वापर करावा तसेच उपप्रादेशिक परिवहन अधिकारी कार्यालयाने जिल्ह्यात रस्त्यावर धावणाऱ्या विना पान २ वर

**प्रतिबंधित गुटख्यावरही कारवाईसाठी कठोर पाऊल उचलण्याची गरज निर्माण झाली आहे. गेल्या तेरा वर्षांपासून प्रतिबंधीत असलेला गुटखा जालना शहरात सतिश उर्फ लालामार्फत मोठ्या शिताफीने बिनधास्त सुरु आहे. युवा पिढी बरबाद होत आहे. अशावेळी जालन्यातून गुटखा हद्दपार करण्यासाठी अवैध वाळुची वाहतुकीची अचुक माहिती देणाऱ्यास बक्षिस जाहीर केले त्या प्रमाणेच अवैध गुटखा साठा, वाहतुक, विक्री होतांनाची अचुक माहिती देणाऱ्यांसाठीही बक्षिस आणि हेल्पलाईन क्रमांक सुरु करा अशी मागणी सूज्ञ नागरिकांमधून होत आहे.**

## रस्त्याच्या बाजूला शेण साचवणाऱ्यांवर मनपाची कारवाई!

पाच व्यक्ती विरुद्ध गुन्हे दाखल



**जालना । प्रतिनिधी -** शहरातील मंगळबाजार येथील समाज मंदीर सम ोर सार्वजनिक रस्त्याच्या बाजुला वेगवेगळ्या ठिकाणी शेणाचे गज मारून ठेवल्याने परिसरात दुर्गंधी पसरून नागरीकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण होत असल्याने महानगरपालिकेकडून दोन वेळेस नोटीस बजावण्यात येवून देखिल मंगळबाजार परिसरातील नागरीकानी शेण उचलून न पान २ वर

## संपादकीय पान

# भारताच्या आण्विक शक्तीचे जनक

भारताच्या आण्विक शक्तीचे जनक असे ज्यांना म्हटले जाते त्या डॉ होमी जहांगीर भाभा यांचा आज जन्मदिन. स्वतंत्र भारताला समर्थ आणि बलवान बनवण्यासाठी ज्या महान व्यक्तींनी जीवाचे रान केले त्यात डॉ होमी जहांगीर भाभा याचे नाव आवर्जून घेतले जाते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणू आणि अवकाश क्षेत्रात जे कार्य केले त्यामुळे जगभर भारताचे नाव झाले. डॉ होमी जहांगीर भाभा यांचा जन्म सदन पारशी कुटुंबात ३० ऑक्टोबर १९०९ रोजी झाला. त्यांचे वडील डॉ जहांगीर भाभा हे बॅरिस्टर होते. त्यांच्या वडिलांना वाचनाची खूप आवड होती त्यामुळे त्यांनी खूप पुस्तके गोळा केली होती त्यात विज्ञान या विषयाचीही पुस्तके होती. डॉ होमी यांना लहानपणापासून विज्ञानाची आवड होती. त्यामुळे त्यांनी विज्ञानाची अनेक पुस्तके वाचून काढली. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यावर होमी यांनी इंजिनिअर व्हावे असे त्यांचा वडिलांना वाटत होते पण होमी यांनी आपल्याला गणित आणि पदार्थ विज्ञान हे विषय आवडतात आणि त्यातच आपण करियर करणार असे वडिलांना ठामपणे सांगीतले. वडिलांनी त्यांना या विषयात करियर करण्यास परवानगी दिली पण आधी इंजिनिअरिंग पूर्ण करण्याची अट घातली. त्यामुळे होमी यांनी १९३० साली केम्ब्रिज विद्यापीठातून पहिल्या श्रेणीत इंजिनिअरिंग पूर्ण केले. तसेच पॉल डिरेक यांच्या मार्गदर्शनाखाली गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयांचा अभ्यासही केला. गणित आणि पदार्थ विज्ञान या विषयात त्यांना खूप गती होती त्यामुळे या विषयात त्यांनी अनेक बक्षिसे आणि शिष्यवृत्त्या मिळवल्या. १९४० साली ते भारतात परत आले. भारतात आल्यावर त्यांनी बंगळुरू येथील भारतीय विज्ञान संस्थेत प्राध्यापक म्हणून काम केले. १९४५ साली टाटा मूलभूत संशोधन संस्थेची स्थापना करण्यात त्यांचा मोलाचा वाटा होता. पुढे याच संस्थेचे ते संचालक बनले. संचालक असतानाही त्यांनी आपले संशोधन कार्य सोडले नाही. देश स्वातंत्र्य झाल्यानंतर १९४८ साली त्यांच्या पुढाकाराने भारत सरकारने अणू ऊर्जा आयोगाची स्थापना केली. या संस्थेचेही ते संचालक होते. या संस्थेत त्यांनी आपल्या संशोधनाला सुरुवात केली, तेंव्हा मुल कण, नवे सिद्धांत, नवे तंत्रे उदयास आली होती. त्यात डॉ होमी भाभा यांनी मोलाची भर टाकली. १९५४ च्या ऑगस्ट महिन्यात भारत सरकारने अणुऊर्जा विकासासाठी स्वतंत्र खातं निर्माण केले त्यावेळी या खात्याचे पहिले सचिव म्हणून डॉ होमी भाभा यांचीच निवड करण्यात आली. या अणुऊर्जा विकास संशोधन खात्याने मुंबईत तुर्भे येथे देशातील पहिले अणू विषयक संशोधन करणारं केंद्र डॉ भाभा यांच्याच नेतृत्वाखाली उभे केले. त्यानंतर १९५६ साली देशातीलच नव्हे तर आशिया खंडातील पहिली अणुभट्टी सुरु करण्यात आली. अणुविषयक व आंतरीक्ष विषयक अशा दोन्हीही क्षेत्रात महत्वपूर्ण आणि भक्कम पाया घालण्याचं श्रेय हे डॉ होमी जहांगीर भाभा यानांच जाते. अणुशक्तीचा वापर विघातक कामासाठी नव्हे विधायक कामासाठी झाला पाहिजे असे त्यांचे मत होते. १९५५ मध्ये जिनिव्हा येथे भरलेल्या आणि संयुक्त राष्ट्र संघामार्फत आयोजित अणुऊर्जेचा वापर शांततामय विकासकार्यासाठी वापर या विषयाच्या परिसंवादाचे डॉ भाभा हे अध्यक्ष होते. या परिसंवादात त्यांनी अणुऊर्जेचा वापर अणुबॉम्ब तयार करण्यासाठी न करण्याचे आव्हान सर्व देशांना केले होते. डॉ होमी जहांगीर भाभा यांनी अणुऊर्जा आणि आंतरीक्ष क्षेत्रात जे महान कार्य केले त्यामुळे त्यांना अनेक आंतरराष्ट्रीय पुरस्कार मिळाले. भारत सरकारनेही त्यांना पद्मभूषण पुरस्काराने गौरवले. २४ जानेवारी १९६६ रोजी स्वित्झर्लंड मधल्या माँ ब्लँ या उंच शिखरावर झालेल्या भीषण अपघातात या महान शास्त्रज्ञाचे दुर्दैवी निधन झाले. त्यांच्या निधनानंतर तुर्भे येथील अणू संशोधन केंद्राचे नाव बदलून भाभा अणुसंशोधन केंद्र असे करण्यात आले. आज त्यांच्या जन्मदिनी त्यांना विनम्र अभिवादन!

**श्याम बसप्पा ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५**

# शाळांचे व्यावसायिकरण व राजकारण झाल्याने देशातील ८ हजार शाळा रिकाम्या!

देशात २० हजार शिक्षक फुकट पगार घेतात ही बाब खरी आहे यात दुमत नाही.परंतु याला जबाबदार कोण?याचा विचार राजकीय पुढाऱ्यांनी व सरकारने प्रथम करायला पाहिजे. कारण याचे खरे दोषी देशातील ९८ टक्के राजकीय पुढारी व राजकारणी आहेत.देशातील राजकीय पुढाऱ्यांनी आपल्या मुलांना कधीतरी सरकारी शाळांमध्ये टाकण्याचा प्रयत्न केला का? यांचाही अभ्यास राजकीय पुढाऱ्यांनी करावा.राजकीय पुढारी आपले मुल विदेशात शिक्षणासाठी पाठवितात आणि १४० कोटी जनतेला ग्याण सांगतात.म्हणजे लोका सांगे ब्रह्मज्ञान आणि स्वतः कोरडे पाषाण. देशातील प्रत्येक राज्यांनी सरकारी शाळांकडे जातीने लक्ष दिले असते तर विद्यार्थी जास्तीत जास्त व शिक्षक कमी पडले असते.परंतु अशा योजना राजकीय पुढाऱ्यांना परवडणाऱ्या नसतात. कारण त्यांना आम जनतेशी, पालकांशी व विद्यार्थ्यांशी काहीही देणेघेणे नसते. राजकिय पुढारी आपली तिजोरी कशी भरता येईल याकडे जातीने लक्ष देतात.याच हेतुने देशात खाजगी शाळांचा जन्म झाला आणि या संपूर्ण शाळा-महाविद्यालये जास्तीत जास्त राजकीय पुढाऱ्यांचे असल्याचे दिसून येते ही बाब सर्वांनाच ग्यात आहे. त्यामुळे देशातील ८ हजार शाळा रिकाम्या व २० हजार शिक्षक फुकटचा पगार घेतांना दिसतात. याला जबाबदार शाळा किंवा शिक्षकांना धरता येणार नाही तर याला मुख्य जबाबदार आहेत आजचा राजकीय पुढारी त्यामुळेच त्यांच्या जवळ आज गडगंज संपत्ती दिसून येते. आपल्याला आणखी एक उदाहरण देता येईल, देशात सर्वांत मनाने आणि मालमत्तेने श्रीमंत आपला शेतकरी आहे.परंतु यांना गरीबांच्या खाईत लोटण्याचे काम राजकीय पुढाऱ्यांनी केले. आज शेतकरी श्रीमंत असुन सुद्धा पैशांनी गरीब आहे आणि राजकीय पुढारी काही नसुन सुध्दा करोडपती आहेत हे कृषिप्रधान देशाचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.पुर्वी देशात सरकारी शाळांशिवाय पर्याय नव्हता.सरकारी शाळांमध्ये दिले जाणारे शिक्षण अत्यंत मोलाचे आणि महत्वाचे होते. कारण पुर्वी प्रत्येक शिक्षक जिव लावून शिकवायचे आणि त्यातूनच देशातील विद्वान, साहित्यीक, सैनिक, शास्त्रज्ञ, सायंटिस्ट, लेखक, पत्रकार अशाप्रकारे मोठमोठे विद्वान तयार व्हायचे.परंतु गेल्या २० वर्षांपासून निव्वळ शिक्षणाचा बाजार मांडल्याचे दिसून येते.यामुळे देशातील संपूर्ण शाळांची परिस्थिती दिवसेंदिवस ढासळतांना दिसून येते.याला मुख्य कारण म्हणजे शिक्षण क्षेत्रात वाढता राजकीय हस्तक्षेप. आज आपण पहातो की देशातील अनेक राज्यांमध्ये शिक्षण संस्था राजकीय पुढाऱ्यांच्या आहेत.यामुळे या राजकीय पुढाऱ्यांनी शिक्षणाचे निव्वळ राजकारण केल्याचे दिसून येते.कारण शिक्षण क्षेत्रातील वाढती चढाओढ पाहून राजकीय पुढाऱ्यांनी या क्षेत्राताचा सटीक फायदा घेतला व घेत आहेत.याचे जिवंत उदाहरण म्हणजे आज देशातील प्रत्येक खाजगी शाळा - महाविद्यालय, कॉन्व्हेन्ट यांनी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या दरम्यान पालकांकडून मोठ्या प्रमाणात फी व डोनेशन वसुल करतात व ज्या पध्दतीने फीस व डोनेशन वसुल करतात त्याच पद्धतीने स्टॅण्डर्ड मेंटेनन्स करतात हे संपूर्ण पालकांच्या पैशांवर करतात.परंतु या शिक्षणाच्या व्यवसायिकरणाचा देशातील संपूर्ण सरकारी शाळा -महाविद्यालयांवर विपरीत परिणाम होत आहे आणि याचेच मुख्य कारण म्हणजे देशातील आठ हजार शाळा रिकाम्या आहेत व २० हजार शिक्षक घेताहेत फुकटचा पगार आणि या संपूर्ण गोष्टींना जबाबदार आहेत आजची शिक्षण प्रणाली. सरकारने जर सरकारी शाळा -महाविद्यालयांना प्रोत्साहन देऊन त्यांचा योग्य तो दर्जा वाढविला असता व शक्ती निशी प्रयत्न केले असते तर आज खाजगी शाळा-महाविद्यालयापेक्षा सरकारी शाळांचे शिक्षण उच्च दर्जाचे रहाले असते व २० हजार शिक्षकांना फुकटचा पगार देण्याची पाळी आली नसती हेही तितकेच सत्य आहे. परंतु राजकीय पुढाऱ्यांचे खिशे भरण्याच्या दृष्टीने सरकार खाजगी शाळा-महाविद्यालयाना जास्त प्रोत्साहित करीत आहे ही अत्यंत गंभीर व चिंताजनक बाब आहे असे मला वाटते. शिक्षण मंत्रालयाच्या आकडेवारीत स्पष्ट सांगितले आहे की, देशभरातील जवळपास ८ हजार शाळांमध्ये २०२४-२५ या शैक्षणिक वर्षात एकाही विद्यार्थ्यांने प्रवेश घेतलेला नाही, या शुन्य प्रवेश असलेल्या शाळांमध्ये तब्बल २०८१७ शिक्षक कार्यरत आहेत, म्हणजे एवढे शिक्षक फुकटचा पगार घेत आहेत.याचा गांभीर्याने अभ्यास सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी करणे गरजेचे आहे. आपण शिक्षकांना फुकटचा पगार घेतात असे म्हणतो हे ठीक आहे. परंतु देशातील आमदार-खासदार-मंत्री कोणती मेहनत करतात हेही तर फुकटचा पगार घेतात हे तर समाजसेवा करायला निघाले यांना कशाला हवा पगार,भत्ते? पुर्वीचे राजकीय पुढारी खरोखरच सेवाभावी वृत्तीचे होते व त्यांच्या सेवाभावी वृत्तीमुळे देशातील संपूर्ण शाळा सुरळीत चालायच्या व शिक्षक सुध्दा सेवाभावीने विद्यार्थ्यांना शिकवायचे आणि त्यातूनच विद्यार्थी घडायचे व यातुनच आपला देश सुध्दा घडला. परंतु आजच्या राजकीय पुढाऱ्यांमध्ये सेवाभावी वृत्ती मुळातच रहाली नाही हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.त्यामुळे सरकारने शाळांना किंवा शिक्षकांना दोष देण्यापेक्षा राजकीय पुढारी काय करीत आहे आणि ते खरोखरच सरकारी शाळांना प्रोत्साहन देतात का याकडे सरकारने जातीने लक्ष देण्याची गरज आहे.जय हिंद.

**रमेश कृष्णराव लांजेवार**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# पत्रकारावर जीवघेणा हल्ला

## पत्रकार सुरक्षित नसेल तर जनता कशी सुरक्षित राहील? - सुभाष बोर्डे

जालना । प्रतिनिधी - तालुक्यातील गुंडेवाडी येथील पत्रकार कैलास सदाशिव गजर यांच्यावर काही समाजकंटकांनी प्राणघातक हल्ला करून त्यांना जखमी केले आहे.

हा हल्ला पूर्णपणे पूर्वनियोजित आणि जीव घेण्याच्या उद्देशाने करण्यात आल्याचा आरोप स्थानिक नागरिकांनी केला आहे.

या घटनेनंतर पत्रकारांमध्ये तीव्र संतापाची लाट उसळली असून, हल्लेखोरांवर तात्काळ गुन्हा दाखल करून कठोर कारवाईची मागणी करण्यात येत आहे.



गुंडेवाडी (ता. जालना) परिसरात कार्यरत असलेले पत्रकार कैलास गजर हे स्थानिक प्रश्नांवर निडरपणे वार्तांकन करीत असतात. अशा पार्श्वभूमीवर काही समाजकंटकांनी त्यांच्यावर रात्री उशिरा जीवघेणा हल्ला केल्याचे समोर आले आहे.

हल्ल्यात पत्रकार गजर गंभीर जखमी झाले असून, त्यांच्यावर उपचार सुरू आहेत. घटनेनंतर परिसरात तणाव निर्माण झाला असून, नागरिकांनी आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी केली आहे.

आम आदमी पार्टीचे तालुका अध्यक्ष सुभाष बोर्डे यांनी या घटनेचा तीव्र शब्दांत निषेध केला असून, पत्रकार हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. पत्रकार लोकांचे प्रश्न शासन, प्रशासन आणि लोकप्रतिनिधींपर्यंत पोहोचवतात. जर पत्रकारांवरच असे हल्ले होत असतील, तर सामान्य नागरिकांची सुरक्षा कोण पाहणार? असे त्यांनी विचारले.

त्यांनी पुढे सांगितले की, पत्रकारांवर वाढत्या हल्ल्यांच्या घटनांकडे पाहता शासनाने पत्रकारांना शस्त्र बाळगण्याचे परवाने देण्याचा गंभीर विचार करावा. कारण आज पत्रकार फक्त बातम्या देत नाही, तर अन्यायाविरोधात लढा देत आहे.

गेल्या काही वर्षांत राज्यभरात पत्रकारांवरील हल्ल्यांचे प्रमाण वाढले आहे. बातमी प्रकाशित केल्याच्या कारणावरून अनेक पत्रकारांना दमदाटी, मारहाण, आणि जीवघेणे हल्ले सहन करावे लागतात. याच पार्श्वभूमीवर पत्रकार संघटना आणि सामाजिक कार्यकर्त्यांकडून पत्रकार सुरक्षा कायदा काटेकोरपणे लागू करण्याची मागणी पुन्हा एकदा जोर धरू लागली आहे.

पत्रकार हा समाजाचा आरसा आहे - तो शासन आणि जनतेतला विश्वासाचा दुवा आहे. पण अलीकडील काळात पत्रकारांवर होणारे हल्ले हे केवळ व्यक्तीवरचे नव्हे, तर लोकशाहीवरील हल्ले मानले जातात. सरकारने पत्रकारांच्या सुरक्षेसाठी स्वतंत्र सुरक्षा यंत्रणा आणि शस्त्र परवाना धोरणाचा गंभीर विचार करणे आवश्यक झाले आहे.

जर चौथा स्तंभच डळमळीत झाला, तर लोकशाहीची पायाभरणीच ढासळण्याची भीती व्यक्त होत आहे.

# जाफराबाद तालुक्यातील खामखेडा येथे नवीन पोलीस पाटील; प्रेस कॉन्सिल तर्फे सत्कार



**विशाल देशमुख**

**जाफराबाद -** तालुक्यातील खामखेडा येथील पोलीस पाटील पद अनेक दिवसापासून रिक्त होते. पोलीस पाटील पद भरण्याची प्रक्रिया नुकतीच संपन्न झाली. या पोलीस पाटील पदासाठी खामखेडा येथून शाहरुख खान सलीम खान या उच्चशिक्षित तरुणाची निवड करण्यात आली. नुकतीच महसूल च्या उपविभागीय अधिकारी यांच्याकडे मुलाखती संपन्न झाल्या आणि नुकतीच यादी जाहीर करण्यात आली त्यात या मुलाचा समावेश करण्यात आला. एक उच्चशिक्षित तरुण गावच्या विकासासाठी आणि गावाच्या सहकार्यासाठी पुढे येतो आहे यासाठी गावात आनंदोत्सव साजरा करण्यात आला. पोलीस पाटील पदी नियुक्त झालेल्या व्यक्तीचे सर्व कुटुंब गावातील सर्व कार्यक्रमात हजेरीने भाग घेत असतात. सर्व कार्यक्रमात शेवटपर्यंत हजर असणारे कुटुंब आणि या कुटुंबाकडेच पोलीस पाटील पद आल्याने गावात आनंद साजरा करण्यात आला. याप्रसंगी प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्र जालना शाखा व जाफराबाद शाखेच्या वतीने या तरुणाचा सत्कार करण्यात आला. माझ्यावर दाखवलेला विश्वास मी सार्थ ठरविन त्याचबरोबर कायदा आणि सुव्यवस्था शांतता राखण्याचा व समान भूमी कार्य करण्याचा माझा मानस असेल. माझ्यावर दाखवलेल्या विश्वासाबद्दल मला अभिमान असून मी गावाच्या विकासासाठी सदैव सक्रिय राहील. तसेच माझ्या सेवा काळामध्ये पारदर्शकता असेल. अनेकांनी तरुणांचे अभिनंदन करतानाच प्रेस कौन्सिल ऑफ महाराष्ट्राच्या वतीने जालना जिल्हा उपाध्यक्ष दत्ता देशमुख, प्रेस कॉन्सिल ऑफ महाराष्ट्राचे जाफराबाद तालुका अध्यक्ष शेख अश्फाक, जाफराबाद मधील जेष्ठ नागरिक तथा सामाजिक कार्यकर्ते माजी सरपंच मोहम्मद चाऊस, भारत मेडिकलचे राजा चाऊस, सलीम पठाण यांनी यथोचित सत्कार केला.

# मांसविक्रीची दुकाने बंद करण्याची मागणी

**जालना -** शहरातील नूतन वाहसात भागात मांस विक्रीचे दुकाने सुरू असून त्यामुळे मोकाट कुत्रे वाढलेले आहे. ही दुकाने बंद करण्याची मागणी नागरिकांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे. मंमादेवी नगर येथे शासकीय गोडाऊन असून या शासकीय गोडाऊनला गेट बसवण्याची मागणही करण्यात आली. याबाबत घोषणाबाजी करत मोर्चा काढत जिल्हाधिकारी यांच्याकडे धाव घेतली. या संदर्भात दिलेल्या निवेदनावर शरद मांगदरे, रवी जगदाळे, अशोक पवार, राहुल मांगधरे, विजय जाधव, अमोल रत्नपारखे, संदीप साबळे, बालाजी वेलवंदे, गोविंद राजगिरे, गुरुदत्त शिंदे आदींच्या साक्षरी आहेत.

## न्यू महाराष्ट्र ट्रेडिंग कंपनीचा शुभारंभ

# अद्रक वॉशिंग मशीनचा उपक्रम राबवणार



**विशाल देशमुख**

**टेंभुर्णी -** तालुका जाफराबाद जिल्हा जालना येथून जवळच असलेल्या जाफराबाद रोडवर गोंधनखेडा शिवारामध्ये, न्यू महाराष्ट्र ट्रेडिंग कंपनीचा शुभारंभ करण्यात आला. या न्यू महाराष्ट्र ट्रेडिंग कंपनीचे गफार पठाण फौजी सेट काळेगाव येथील रहिवाशी असून त्यांनी या भागामध्ये, एक सामाजिक कार्यकर्ते म्हणून आपला नावलौक मिळवलेला आहे. गोरगरिबांच्या सुखदुःखामध्ये सामील होताना त्यांनी आपला एक व्यवसाय सुरू करावा हा उद्देश ठेवून न्यू महाराष्ट्र ट्रेडिंग कंपनी सुरुवात केली. या कंपनीमार्फत त्यांनी अद्रक वॉशिंग मशीन आणून त्याचा शुभारंभ नुकताच करण्यात आला. या उद्घाटन प्रसंगी तालुक्यातील राजकीय नेते सामाजिक कार्यकर्ते, शेतकरी वर्ग, ज्येष्ठ नागरिक तसेच होतकरू तरुण या वर्गांचा विशेष सहभाग होता. या कार्यक्रमाच्या उद्घाटन प्रसंगी जिल्हा परिषद सदस्य शालिग्राम पाटील म्हस्के यांच्याबरोबरच, माजी आमदार चंद्रकांत दानवे पाटील यांची आवर्जून उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य म्हणजे तालुक्यातील सर्वच पक्षाचे कार्यकर्ते सर्वच पक्षाचे नेते या कार्यक्रमाला हजेरी लावून गेले. सर्वांनी शुभेच्छा देताना सांगितलं की शेतकऱ्यांच्यासाठी हा अत्यंत चांगला उपक्रम असून या उपक्रमाची भरभराट होऊ असे आशीर्वाद सुद्धा अनेकांनी याप्रसंगी दिले. या कार्यक्रमाला पत्रकारांची मोठी उपस्थिती होती. याचबरोबर त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या मित्रमंडळींनी स्नेहसंमेलना सारखाच कार्यक्रम आयोजित केल्याचा भास सुद्धा होत होता.

पान १ वरुन

## जालना महानगर ...

स्थान मिळवेल. जालना जिल्ह्यातील राजकारणात हा प्रवेश सोहळा काँग्रेससाठी टर्निंग पॉइंट ठरणार, आगामी महानगरपालिका निवडणुकीत आम्ही नेते नाही तर जनता काँग्रेसचा महापौर करेल अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरू झाली आहे.

या प्रसंगी प्रतापराव लहाने पाटिल, माजीद खान, अब्दुल रहीम, इमरान खान, सय्यद रहीम यांनी त्यांच्या समर्थकांसह, नगरसेवक फारूक तुंडीवाले, पंजाबराव अवघड, शहेबाज फौजी यांचा ग्रुप, इम्रान मणियार राहील मणियार, आकाश श्रीरामवार, सय्यद सरफराज, शहेबाज अंसारी, अमजद खान, अकबर खान, इब्राहिम शेख, कृष्णा पडुळ, अनस चाउस, शेख खलील, राजेंद्र गोरे, वाजेद खान, कल्याण तारडे, लक्ष्मण मसलेकर, अजय बनकर, त्र्यंबक पाबले, नजीब, अशोक उबाले, शकील शेख, सुभाष कामले, आसिफ अंसारी, सिताराम अग्रवाल, सूरज यंगटवार, शमशुद्दीन शेख, खलील, मसूद, जाफर, तौफीक, संदीप जाधव, अरशद, वसीम शेख, श्रीरंग कामटे, कलीम खान, मोइज अंसारी, वसीम खान, शहेबाज खान यांच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने कांग्रेस पक्षात प्रवेश केला.

## वाळुची अवैध ...

क्रमांकाच्या ट्रॅक्टर, टिप्पर, ट्रक आणि हायवा यासह इतर वाहनावर तात्काळ कारवाई करावी. तसेच तहसील कार्यालय व पोलिस ठाणे येथे दंडात्मक कार्यवाहीतील वसुली प्रलंबित असलेल्या वाहनांचा त्वरीत लिलाव करण्यात यावा. एमपीडीएम कायद्याचा वापर कमी होत असल्याने अवैध गौण खनिज उत्खनन करणाऱ्यांवर दाखल गुन्ह्यांच्या अनुषंगाने स्थानबध्दता होण्यासाठी कारवाई करावी. वाळुची चोरी रोखण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयाचा स्वतंत्र हेल्पलाईन क्रमांक लवकरच उपलब्ध करुन दिला जाणार असून त्यावर अचुक माहिती देवून अवैध वाळुची वाहतुक करणारे वाहन पकडले गेल्यास त्या व्यक्तीला ५ हजार रुपयांचे बक्षिसही दिले जाणार आहे, असेही त्यांनी सांगितले.

जालना जिल्ह्यात वाळू तस्करी हा केवळ आर्थिक गुन्हा नाही, तर पर्यावरण आणि प्रशासनिक शिस्तीवरचा घाला आहे. दरवर्षी शासनाच्या तिजोरीत जाणारी कोट्यवधींची महसूल रक्कम बेकायदेशीर हातात जाते. अशा पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांचा ॲक्शन मोड हे स्वागतार्ह पाऊल मानले जात आहे. परंतु, नागरिकांच्या मते गुटखा, अंमली पदार्थ, आणि अवैध दारू विक्री हे सर्व एकाच साखळीचा भाग आहेत. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने केवळ वाळू नव्हे, तर या सर्व अवैध व्यापारांविरोधात एकत्रित, दीर्घकालीन मोहिम उभारावी, अशी अपेक्षा वाढली आहे.

## रस्त्याच्या बाजुला ...

घेतल्याने दिनाक २८/१०/२०२५ रोजी मगळबाजार कार्यक्षेत्रातील राधेश्याम लोखडे, स्वच्छता निरीक्षक जालना शहर महानगरपालिका यानी अनुक्रमे १ केतन रमेश यादव, २. नितिन मन्नुलाल मेघावाले ३. धनुलाल निलाराम भगत, ४ सोनु अर्जुन भगत, ५. अमर रामलाल भुरेवाल सर्व रा. मंगळबाजार एकुण पाच जणावर सदर बाजार पोलीस स्टेशनमध्ये रितसर गुन्हा नोंद करण्यात येवून कायदेशीर कार्यवाही प्रस्तावित केली आहे.

तसेच सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, सार्वजनिक ठिकाणी कचरा फेकू नये, रस्त्यावर जनावरे सोडू नये तसेच प्राण्याचे मलमूत्र सार्वजनिक ठिकाणी टाकू नये अन्यथा कायदेशीर कार्यवाही केली जाईल.

# भगवान सहस्त्रार्जुन जन्मोत्सव नागपूर येथे शोभायात्रा संपन्न



**नागपूर -** कार्तिक शुक्ल पक्ष सप्तमीला भगवान सहस्त्रार्जुन जन्मोत्सव संपुर्ण देशभरात मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात आला. त्याच अनूषंगाने दिनांक २९ आक्टोंबर २०२५ कार्तिक शुक्ल पक्ष सप्तमीला भगवान सहस्त्रार्जुन जन्मोत्सवानिमित्त नागपूर येथे भव्य शोभायात्रा काढण्यात आली.हि शोभायात्रा गोलीबार चौक येथुन प्रारंभ होऊन गांजाखेत चौक,गांधीबाग गार्डन, तीननल चौक,भारत माता चौक,नंगापुतळा चौक या परीसरातुन वाजतगाजत नेण्यात आली यावेळी समाजाच्या अनेक भक्तांनी झांकीवर फुलांचा वर्षाव करून भगवान सहस्त्रार्जुन यांना नमन केले व सर्वत्र उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आणि या शोभायात्रेचे समापन गोलीबार चौक येथे करण्यात आले. अखिल भारतीय सर्ववर्गीय कलार समाज नागपुर,सोमवंशीय सहस्रार्जुन क्षत्रिय समाज नागपुर, महाराष्ट्र कलाल-कलार समाज संघटना नागपूर एवं सहस्रबाहु संदेश परिवार नागपुर इत्यादी अनेक संघटनेचे समाज बांधव या शोभायात्रेत मोठ्या संख्येने उपस्थित होते.सर्ववर्गिय कलार समाज के अध्यक्ष भूषण दडवे, सोमवंशीय समाज के संरक्षक डॉ सुभाष राऊत, महाराष्ट्र कलाल-कलार समाजाचे राज्य प्रवक्ता (पत्रकार) रमेश लांजेवार इत्यादीसह समाजाचे अनेक मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते.या शोभायात्रे दरम्यान डॉ सुभाष राऊत यांनी संयुक्त आयोजन व एकतेवर जोर दिला,भूषण दडवेनी नागपुर शहरातील एखाद्या चौकाला भगवान सहस्रबाहु नाव देण्यावर भर दिला तर रमेश लांजेवार यांनी संपूर्ण शाखेतील समाजबांधवांना एकत्र करण्यावर भर दिला. शोभायात्रेमध्ये प्रामुख्याने किशोर पालांदुरकर,रमेश जायसवाल, दीपक वालोदे, दुर्गाप्रसाद चौरागडे, महेन्द्र डोहरे, अरविंद राय,उमेश चौकसे,अनिल मानापुरे,राजेन्द्र राय,देवेन्द्र राय,दिनेश परिहार,अभय राऊत,मिलींद मानापुरे,किशोर दहीकर,शेखर डोरलीकर राकेश जायसवाल,विजय दहीकर, मदनसा रतन, राकेश चव्हाण, पंकज दहिकर,प्रणाली चव्हाटे, सौ अनिता नाकोड,श्रध्दा परिहार, वैशाली मामर्डे, सौ कुमुदिनी बारड,श्रीमती इंदिरा पवार, गजानन पटले,धर्मराज नाकोड, दिलीप राऊत, बलवंत चव्हाटे, महेंद्र डोहारे आदीसह शेकडोंच्या संख्येने अनेक समाजबांधव व भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# जालना जिल्ह्यातील संत निरंकारी भाविक सत्संगाकरिता दिल्लीस रवाना

**जालना । प्रतिनिधी -** दिल्ली येथे होणाऱ्या समागम सत्संग - २०२५ या भव्य आध्यात्मिक सोहळ्यासाठी जालना जिल्ह्यासह नांदेड, परभणी, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील अनेक संत निरंकारी भाविक आज दि.२९ ऑक्टोबर रोजी दिल्ली येथे होणाऱ्या सत्संगाकरिता माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे यांच्या विशेष प्रयत्नातून मागील तीन वर्षापूर्वी सुरु करण्यात आलेल्या नांदेड ते पानिपत या विशेष रेल्वे गाडीने आज रवाना झाले.

जालना जिल्ह्यातील संत निरंकारी भाविक जालना रेल्वे स्थानकावरून या विशेष रेल्वेने सर्व जन रवाना होत असताना भारतीय जनता पार्टी जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, जालना जि.प. सदस्या सौ. आशाताई पांडे, नगरसेविका सौ. संध्याताई देठे, कपिल दहेकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये या रेल्वे गाडीला हिरवा झेंडा दाखविण्यात आला व सकाळी ११.३० वा हि रेल्वे गाडी जालना रेल्वे स्थानकावरून पुढील प्रवासाकरिता रवाना झाली.

यावेळी बोलताना शुभेच्छापर बोलताना भाजपा महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, या जिल्ह्याचे लोकनेते माजी केंद्रीय रेल्वे राज्यमंत्री रावसाहेब पाटील दानवे रेल्वे राज्यमंत्री असताना जालना जिल्ह्याला अनेक नवीन रेल्वे गाड्या सुरु करून दिल्या ज्यामध्ये जनशताब्दी एक्स्प्रेस, वंदेभारत एक्स्प्रेस, ओखा एक्स्प्रेस, छपरा एक्स्प्रेस इत्यादी गाड्यासह अनेक नवीन रेल्वे गाड्या सुरु करून जालना जिल्ह्यातील व्यापारी, उद्योजक, तीर्थयात्री इत्यादीसह जनतेची होणारी प्रवासाची गैरसोय दूर केली. ते बघून मागील तीन वर्षापासून जालना जिल्ह्यातील



संत निरंकारी भाविक उत्तर भारतात होणाऱ्या अध्यात्मिक सोहळ्यासाठी जातात त्यासाठी त्यांनी दानवे साहेबाना विनंती करून विशेष रेल्वे गाडीची मागणी केली होती दानवे साहेबांनी स्वत: प्रयत्न करून या भाविकांची अडचण दूर करण्यासाठी अध्यात्मिक सोहळ्यासाठी नांदेड ते पानिपत हि विशेष गाडी सुरु करून भाविकांची अडचण सोडवली.

यावेळी मान्यवरांनी रेल्वे चालक तसेच जाणाऱ्या सर्व भाविकांचे पुष्पहार घालून स्वागत केले व त्यांच्या पुढील प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी माजी जिल्हा सरचिटणीस देविदास देशमुख, गोवर्धन कोल्हे, विष्णू डोंगरे, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, इत्यादीसह शहरातील भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, जालना तर्फे चालक दिन साजरा

**जालना । प्रतिनिधी -** उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, जालना तर्फे विविध कार्यक्रमांचे आयोजन करून ‘वाहन चालक दिन’ उत्साहात साजरा करण्यात आला.

सकाळी शहरातील अवजड वाहन पार्किंग येथे वाहन चालकांसाठी मार्गदर्शनपर कार्यक्रम घेण्यात आला. या वेळी उपस्थित चालकांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालय, जालना येथे आयोजित मुख्य कार्यक्रमात ट्रक, बस, स्कूलबस, घंटागाडी, ऑटोरिक्षा आदी क्षेत्रातील वाहनचालकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली.

प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित उपप्रादेशिक परिवहन अधिकारी चंद्रमोहन चिंतल यांनी वाहन चालकांचा समाजातील महत्त्वपूर्ण वाटा स्पष्ट केला. त्यांनी सांगितले की, वाहन चालक समाजाच्या दैनंदिन जीवनात महत्वाची भूमिका बजावतात. प्रवाशांची सुरक्षितता, वेळेवर पोहोचवणे आणि समाजातील अनेक क्षेत्रे सुरळीत चालविण्यासाठी त्यांचे योगदान मोलाचे आहे. वाहन चालविताना रस्ता सुरक्षा नियमांचे पालन करणे, वाहनाची योग्य देखभाल करणे व स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे ही प्रत्येक चालकाची जबाबदारी आहे, असे त्यांनी मार्गदर्शनपर भाषणातून सांगितले.

कार्यक्रमात उपस्थित प्रत्येक चालकाला गुलाब पुष्प देऊन सन्मानित करण्यात आले. त्यांच्या समाजाप्रती योगदानाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. शेवटी उपस्थित सर्वांना रस्ता सुरक्षा शपथ देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी उपप्रादेशिक परिवहन कार्यालयातील अधिकारी, मोटर वाहन निरीक्षक, सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन सहाय्यक मोटर वाहन निरीक्षक राजकुमार मुंडे यांनी केले.

या उपक्रमामुळे उपस्थित चालकांनी आनंद व समाधान व्यक्त केले तसेच रस्ता सुरक्षा नियमांचे पालन करण्याचा संकल्प व्यक्त केला. कार्यक्रमाला शहर व परिसरातील विविध मोटर ड्रायव्हिंग स्कूलचे संचालक, कर्मचारी तसेच नागरिकही उपस्थित होते.

# काळेगाव पोलीस पाटील पदी शेख नवाज शेख अफसर यांची नियुक्ती

**जाफराबाद् -** काळेगाव तालुका जाफराबाद येथील सुशिक्षित युवक शेख नवाज शेख आप्सर यांची पोलीस पाटील पदी निवड.

शेख नवाज हे स्पर्धा परीक्षेची तयारी करतात तसेच याचं शिक्षण च् षळश्र झालेले आहे. सध्या ते एका इंग्लिश मेडियम शाळेवर शिक्षक म्हणून काम करीत होते.

जिल्ह्याच्या माननीय जिल्हाधिकारी महोदया यांनी एक पारदर्शक पोलीस पाटील भरती केल्यामुळे त्यांचे जिल्हाभरातून कौतुक होत आहेत.

तसेच शेख नवाज शेख अफसर यांचे सुद्धा गावकरी नारायण पिंपळे,आबेद शेख, इम्रान शेख, तसेच मित्र मंडळ यांनी मोठ्या प्रमाणात सत्कार करून कौतुक केले.

# जालना येथे प्रथमच संत श्री गुलाबराव महाराज चरित्र कथा व सामूहिक पारायण

**जालना । प्रतिनिधी -** तीर्थक्षेत्र चांदुरबाजार येथील संत श्री गुलाबराव महाराज यांच्या पालखीचे मंगळवार दि. ११ नोव्हेंबर रोजी जालना शहरात आगमन होत असून, यानिमित्त प्रथमच दोन दिवस भरगच्च आध्यात्मिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संत गुलाबराव महाराज पारायण ग्रुप आणि माहेश्वरी महिला मंडळाच्यावतीने करण्यात आले आहे. पालखी आगमनानिमित्त सोमवार दि. १० नोव्हेंबर रोजी सायंकाळी ४ ते ६ या वेळेत प्रसीद्ध कथाकार प. पू. श्याम नारायणदासजी चौबे यांच्या रसाळ वाणीतून संत श्री गुलाबराव महाराज चरित्र कथा होणार असून, सायंकाळी ५:३० वाजता मुख्य पोस्ट ऑफिस रोडवरील साई डायग्नोस्टिक सेंटर येथे पालखीचे आगमन होणार आहे. या ठिकाणी पादुकाचे पाद्यपूजनानंतर रूपम हॉलपर्यंत शोभायात्रा काढण्यात येणार आहे.



### टेंभुर्णी पोलिसांची धडाकेबाज कारवाई

## हिवरा काबली व बोरखेडी चिंच परिसरातील अवैध गावठी दारू अड्ड्यावर छापा




**विशाल देशमुख**
**टेंभुर्णी -** पोलीस स्टेशन तर्फे अवैध गावठी दारू अड्ड्यावर छापा टाकण्यात आला. सहाशे लिटर गावठी रसायन व हातभट्टी चे साहित्य नष्ट करण्यात आले. सविस्तर वृत्त असे की टेंभुर्णी पोलीस स्टेशनला गुप्त बातमीदारा मार्फत खबर मिळाली की बोरखेडी चिंच परिसरामध्ये नदी लगत गावठी दारू तयार करणारे रसायन ( सडवा ) तयार करून त्याचा साठा करण्यात आला आहे. अशा माहितीच्या आधारे टेंभुर्णी पोलीस स्टेशन ने एक टीम तयार करून हिवरा काबली व बोरखेडी चिंच परिसरामध्ये छापा टाकण्यात आला. दोन हातभट्टीचे अड्डे उध्वस्त करण्यात आली. त्यात जवळपास सहाशे लिटर ( अंदाजे एक लाख दहा हजार रुपये किमतीचे ) रसायन व हातभट्टीला लागणारे साहित्य नष्ट करण्यात आले. सदरची गावठी हातभट्टी दारू तयार करणारे १) शंकर नाना गायकवाड वय २७ वर्ष २) नामे इंदुबाई उत्तम मोरे वय ४८ वर्ष ३) सुनील शेषराव गायकवाड वय अंदाजे पंचवीस वर्ष सर्व राहणार हिवरा काबली तालुका जाफराबाद जिल्हा जालना टेंभुर्णी पोलीस स्टेशन येथे गुन्हे दाखल करून कायदेशीर कारवाई करण्यात आली आहे. घरची कारवाई माननीय पोलीस अधीक्षक अजयकुमार बंसल, माननीय अप्पर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, माननीय उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. नितीन कटेकर यांचे मार्गदर्शनाखाली टेंभुर्णी पोलीस स्टेशनचे सहाय्यक पोलीस निरीक्षक कैलास भारती, पोलीस उपनिरीक्षक बी एस खार्डे, पोलीस हेडकॉन्स्टेबल मांटे, पोलीस कॉन्स्टेबल शिरसागर, पोलीस कॉन्स्टेबल फुलमाळी, प्लीज कॉन्स्टेबल सानप,मपोका यांनी कारवाई केली असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक बीएस खार्डे करीत आहे.

## जालना व्यापारी महासंघाच्या स्नेहसंमेलन मध्ये टेंभुर्णीचे व्यापारी रामप्रसाद बारगुडे यांचा विशेष सत्कार

**विशाल देशमुख**
**टेंभुर्णी -** व्यापारी महासंघ जिल्हा जालना
जनरल मर्चंट्स असोसिएशन द्वारा आयोजित कार्यकमात टेंभुर्णी येथील तरुण व्यापारी श्री रामप्रसाद बारगुडे यांचा प्रमाणपत्र देऊन मान्यवरांच्या हस्ते विशेष सत्कार करण्यात आला.

जीवन जगणं निरस नाही, परंतु जीवनात आदर्श निर्माण करणे एक मोठी साध्यता आहे.
आपण उद्योग, व्यवसाय क्षेत्रात जन मानसासाठी त्यांच्या अडी-अडचण, हितासाठी व एकजुटी करण्यासाठी आणि संघटनेच्या हितात उत्कृष्ट कार्य केले आहे. निःस्वार्थपणे सेवा देऊन ग्राहकांना, गरजूंना मानव सेवकाच्या रूपाने उत्कृष्ट कार्य केले आहे.

आपण केलेले कार्य समाजासाठी, व्यापार जगताच्या हितात कायम असून अभिनंदनीय आहे. म्हणून आपल्या मान्यवरांच्या हस्ते उत्कृष्ट /आदर्श कार्याबद्दल पुरस्कार प्रदान करण्यात येत आहे.

असा मचकूर या प्रमाणपत्रात करण्यात आला आहे.हे प्रमाणपत्र जालना जिल्हाधिकारी व कार्यक्रम चे उदघाटक जालना जिल्ह्याचे जिल्हा अधिकारी श्रीमती आशिमां मित्तल श्री अजयकुमारजी बंसल
जिल्हा पोलीस अधीक्षक



जालना विशेष तसेच कार्यक्रम अध्यक्ष व व्यापारी महासंघाचे अध्यक्ष श्री हस्तीलमल बंब श्री सतीश पंच यांच्या प्रमुख उपस्थिती देण्यात आले.

या वेळी टेंभुर्णी हून रामप्रसाद बारगुडे यांच्या सह बद्रीप्रसाद अग्रवाल ज्ञानेश्वर डोमाळे गणेश चांदोडकर सचिन गायमुखे नंदकिशोर बोराडे दिनेश जोशी नारायण धनवई हे व्यापारी उपस्थित होते.त्यांना भेटलेल्या या पुरस्कार बद्दल टेंभुर्णी व्यापारी महासांच्या वतीने अलकेश सोमाणी धीरज काबरा संजय बोडखे रामू पन्हाळकर कल्पेश सोमाणी शिवराज सपाटे सुरज जांगिड गोपाल बांगड सय्यद मोहियीद्दीन शंकर मुळे प्रदीप काबरा अतुल बूजाडे सुभाष काबरा अर्जुन कुमकर आदी व्यापारी मंडळी ने त्यांचे अभिनंदन केले.

## ४७ व्या आशियान-भारत शिखर परिषदेसाठी अंकिता पवारची निवड

**जालना । प्रतिनिधी -** अखिल भारतीय विद्यार्थी परिषदेची पूर्व राष्ट्रीय मंत्री अंकिता पवार हिची शासनाने नव्या पिढीच्या आश्वासंक सक्षम युवा नेतृत्वाची दखल घेऊन मलेशिया राजधानी क्वालालंम्पूर येथे आयोजित ४७ व्या आशियान -भारत शिखर परिषदेसाठी निवड केली. मराठवाड्याची कन्या अंकिता पवार यांची आशियान शिखर परिषदेसाठी मलेशिया येथे रवाना झाली आहे. सर्व स्तरातून कौतुक केले जात आहे. या शिखर परिषदेत आग्नेय आशिया देशांतील सामाजिक, राजकीय, आर्थिक, सुरक्षा या विषयांवर विचारमंथन होणार आहे.



## हिंदु खाटीक समाजातील अर्जदारांनी अर्ज करण्याचे आवाहन

**जालना । प्रतिनिधी -** हिंदु खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळाच्या अनुदान, बीज भांडवल व थेट कर्ज योजना तसेच एनएसएफडीसी योजनेतंर्गत सन २०२५-२६ वर्षाकरीता अर्ज मागविण्यात आले आहेत. तरी हिंदु खाटीक समाजातील इच्छुक अर्जदारांनी लाभासाठी जिल्हा कार्यालय जालना येथे अर्ज सादर करावेत, असे आवाहन जिल्हा व्यवस्थापक यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.


हिंदु खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळ मर्या. ( महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्या. यांची उपकंपनी) जिल्हा कार्यालय जालना येथे वर्ष २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी अनुदान योजना-५, बीज भांडवल योजना-५, थेट कर्ज योजना-२ आणि एनएसएफडीसी योजना -६ याप्रमाणे उद्दीष्ट प्राप्त झाले आहे. तरी हिंदु खाटीक समाजातील इच्छुक अर्जदारांनी या योजनेचा लाभ घेण्यासाठी जिल्हा कार्यालय जालना येथे संपर्क साधावा. अर्जासोबत जातीचा दाखला, उत्पन्नाचा दाखला, शिधापत्रिका, आधार कार्ड, पॅन कार्ड, कोटेशन, प्रकल्प अहवाल, व्यवसाय जागेचा पुरावा, पासपोर्ट फोटो आणि व्यवसाय लायसन्स आदि कागदपत्राच्या छायांकित प्रतिसह सादर करावा. असेही कळविले आहे.

## स्थानिक स्वराज्य निवडणूकीच्या अनुषंगाने जिल्हास्तरीय कायदा व सुव्यवस्था बैठक संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** आगामी कालावधीत स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणूक प्रक्रीया पार पडणार असुन, या पार्श्वभूमीवर जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने जिल्ह्यात कुठेही कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या अध्यक्षेत बैठक संपन्न झाली त्यावेळी श्रीमती मित्तल या बोलत होत्या. यावेळी बैठकीस पोलीस अधिक्षक अजयकुमार बसंल, प्रभारी अपर उपजिल्हाधिकारी सरिता सुत्रावे, प्रभारी निवासी उपजिल्हाधिकारी मनीषा दांडगे, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल म्हणाल्या की, येणाऱ्या कालावधीत स्वराजय संस्थेच्या निवडणूक होणार आहे. याकरीता जिल्हा प्रशासन आणि पोलीस प्रशासनाने जिल्ह्यात शांततेसाठी आणि कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न् उद्भवणार नाही यासाठी पूर्व नियोजन करावे. तसेच सदर कालावधीत जिल्ह्यात व्यवस्थित बंदोबस्त ठेवण्यात यावा. गर्दी नियंत्रण, वाहतूक व्यवस्थापन व संभाव्य कायदा सुव्यवस्था प्रश्नांवर उपाययोजना कराव्यात. जिल्ह्यात कुठेही कोणताही अनुचित प्रकार किंवा गुन्हेगारी घटना घडू नये यासाठी दक्षता घ्यावी. गुन्हेगाराविरुध्द म



हाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ५५, ५६ व ५७ अन्वये तातडीने कारवाई होण्याचे अनुषंगाने उपविभागीय दंडाधिकारी तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी समन्ववय साधुन प्रकरण दाखल झालेपासुन एक महिन्यात निकाली काढावेत. तसेच तात्काळ प्रलंबित प्रकरणे निकाली काढावीत. हद्दपार इसम आदेशाचे पालन करत असल्याचे पोलीस विभागाने वेळोवेळी तपासणी करावी. प्रतिबंधात्मक कारवाईचे प्रकरणे चालविण्याकरीता दिवस व वेळ निश्चित करुन प्रकरणे निकाली काढावीत. जेणेकरुन तातडीने प्रकरणे निकाली निघतील. गुन्हेगाराविरुध्द प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाईचे अनुषंगाने तसेच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहील याकरीता पोलीस विभागाने आवश्यक तपासणी करुन चझऊ कायद्यांतर्गत स्थानबध्द्तेकरीता प्रस्ताव सादर करावेत. भारतीय नागरीक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १२६, १२७, १२८, १२९ अन्वये पोलीस विभागाकडून करण्यात प्रतिबंधात्मक कारवाई मध्ये प्रकरणपरत्वे, अंतिम बंधपत्र घेण्याचे प्रमाण अत्यंत कमी असुन, अंतीम बंधपत्र घेणे. तसेच बंधपत्राचे पालन होत असल्याची बाब पोलीस विभागाने तपासणी करावी. यासाठी संबंधित पोलीस निरीक्षक व कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसिलदार यांनी वेळोवेळी एकत्रित बैठक आयोजीत करुन बैठकीत आढावा घ्यावा. तसेच अवैध मद्य विक्री होणार नाही याकरीता राज्य उत्पादन शुल्क विभागाने पथक स्थापन करुन सदर पथकामार्फत रात्रवेळी गस्त तसेच तपासणी करुन अवैध मद्य विक्री विरोधात कारवाई करावी. शहरातील तसेच पुर्ण जिल्ह्यातील गुन्हेगारी वाढणार नाही, याकरीता सर्व यंत्रणामध्ये समन्वय ठेवून वेळोवेळी कारवाई करावी. सोशल मिडिया व इतर माध्यमांतून अफवा फैलवणाऱ्यांवर कडक कारवाई करावी. कायदा व सुव्येवस्थेचे अनुषंगाने गुन्हेगाराविरुध्दि प्रभावी प्रतिबंधात्मक कारवाई होणेकरीता महसूल विभाग व पोलीस विभागात समन्वायासाठी पोलीस स्टेवशन निहाय कर्मचारी यांची नियुक्ती् करणे व त्यां चे मार्फत पाठपुरावा करुन प्रचलित कायद्यान्वीये प्रतिबंधात्मनक कारवाई पुर्ण करावी. पोलीस पाटील पदाकरीता निवड प्रक्रिया पूर्ण झाली असून, निवड झालेल्या उमेदावारांचे पोलीस विभागाने चारित्र्य पडताळणी तात्काळ उपलब्ध करुन द्यावे. जेणेकरुन सदरील पात्र उमेदवारांना नियुक्ती पत्र देण्याची कार्यवाही लवकरात लवकर पुर्ण करता येईल. तसेच नागरिकांनी देखील सहकार्य करून शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्याचे आवाहन जिल्हाधिकारी श्रीमती मित्तल यांनी यावेळी केले.

यावेळी पोलीस अधिक्षक बंसल म्हणाले की, आगामी काळात पार पडणाऱ्या निवडणूक वेळी जिल्ह्यात शांतता व सुरक्षितता अबाधित राखण्याच्या अनुषंगाने पोलिस विभागामार्फत प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्यात येत आहेत. तसेच भरारी पथके, चेकपोस्ट आणि तक्रार निवारण केंद्र ठिकाणी ठिकाणी उभारण्यात येणार आहेत. जिल्ह्यात कुठेही अनुचित प्रकार होणार नाही, तसेच कायदा आणि सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस विभागामार्फत योग्य नियोजन करण्यात आले आहे.

यावेळी बैठकीस जिल्ह्यातील सर्व उपविभागीय अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी, तहसीलदार यांची उपस्थिती होती.

## रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाची आढावा बैठक

**जालना । प्रतिनिधी -** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले गट) जालना जिल्ह्याच्या वतीने आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर एक महत्त्वपूर्ण आढावा बैठक शनिवार, दि. १ नोव्हेंबर २०२५ रोजी दुपारी १ वाजता अंबड चौफुली येथील शासकीय विश्रामगृह येथे आयोजित करण्यात आली आहे.

या बैठकीचे अध्यक्षस्थान रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे राज्य संघटक सचिव ॲड. ब्रम्हाणंद चव्हाण भूषवणार असून, जिल्ह्यातील प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची उपस्थिती अपेक्षित आहे. या बैठकीत स्थानिक स्वराज्य संस्थांशी संबंधित विविध मुद्द्यांचा सविस्तर आढावा घेण्यात येणार आहे.

पक्षाच्या धोरणात्मक नियोजनानुसार जिल्हा परिषद, पंचायत समित्या, महानगरपालिका आणि नगरपालिकांच्या निवडणुकांमध्ये पक्षाची भूमिका निश्चित करणे, जागावाटपाची मागणी करणे तसेच विविध सामाजिक आणि नागरी समस्यांवर तोडगा काढण्यासाठी प्रयत्न करण्याच्या दृष्टीने ही बैठक महत्त्वाची ठरणार आहे.

बैठकीदरम्यान अतिक्रमण विषयाचे नियमाकुलीकरण, गरजू नागरिकांना घरकुल योजना उपलब्ध करून देणे, रस्ते, समाजमंदिरे आणि मूलभूत सुविधांच्या विकासासाठी प्रशासकीय स्तरावर पाठपुरावा करण्याचे नियोजन ठरवले जाईल. तसेच पक्षाची संघटनात्मक बांधणी, नवीन सदस्य नोंदणी, आणि कार्यकर्त्यांच्या संघटनात्मक जबाबदार्यांवरही चर्चा होणार आहे.

या बैठकीला सुधाकर रत्नपारखे, मधूकर बोबडे, मोकींद पाईकराव, बबन रत्नपारखे, ॲड. सिध्दार्थ चव्हाण, महेंद्र रत्नपारखे, विजू खरात, अनिल खिल्लारे, स्वप्नील गायकवाड, प्रभाकर रुपवते, लहु उघडे, राजेंद्र भिंगारदेव, राजेंद्र साबळे, सुरेश खरात यांसारखे ज्येष्ठ पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाच्या कार्यकर्त्यांना व पदाधिकार्यांना या बैठकीस उपस्थित राहण्याचे आवाहन ॲड. ब्रम्हाणंद चव्हाण यांनी केले असून, ही बैठक आगामी निवडणुकीसाठी पक्षाच्या तयारीचा रोडमॅप निश्चित करणारी ठरण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

## इंदिरानगर मध्ये स्वखर्चाने पिण्याच्या पाण्याची पाइपलाईन अखेर सुरळीत

**परतूर । प्रतिनिधी -** येथील इंदिरा नगर परिसरात अनेक वर्षा पासून पिण्याच्या पाण्याची समस्या होती. नगर पालिके कडून यावर कोणताही उपाय होत नसल्याने नागरिकांचे हाल होत होते.वारंवार तक्रार करूनही पिण्याच्या पाईपाची दुरुस्ती होत नव्हती.यावर सामाजिक कार्यकर्ते इजरान कुरेशी यांनी पुढाकार घेत स्वतःच्या खर्चातून या समस्या कडे जाणीवपूर्व लक्ष घालून खराब झालेल्या पाईप लाईन ला जेसीबीच्या साह्याने खोदकाम करून पाईप लाईन दुरुस्ती केली. इंदिरानगर भागात आता सुरळीत पाणीपुरवठा सुरू झाल्याणे नागरिकांना पिण्याच्या पाईपाची समस्या कायमस्वरूपी दूर झाल्याने सामाजिक कार्यकर्ता व भावी नगरसेवक इजरान कुरेशी यांचे आभार मानले जात आहेत. नगर पालिकेकडे वारंवार तक्रारी करुनही निधीअभावी किंवा इतर कारणांमुळे या कामाकडे दुर्लक्ष झाले होते.परंतू प्रभाग १,मधील नागरिकांची पिण्याच्या पाण्याची समस्या भेडसावत असताना यावर तात्काळ पुढाकार घेत इजरान कुरेशी यांनी या समस्येला सामोरे जात कायमस्वरूपी दूर करत आपल्या हाताने मोलाचं काम केले आहे.



## महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम अंमलबजावणीसाठी मुदतवाढ

**जालना । प्रतिनिधी -**
महाराष्ट्र गुंठेवारी विकास अधिनियम (नियमाधीन करणे श्रेणीवाद व नियंत्रण) अधिनियम, २०२१ अंतर्गत महाराष्ट्र शासनाने ३१ डिसेंबर २०२० पुर्वीचे अनधिकृत भुखंड अनधिकृत भुखंडावरील बांधकाम नियमाधीन करण्यास मान्यता दिलेली आहे. जालना जिल्हयातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायत हद्दीअंतर्गत क्षेत्र वगळून उर्वरित ग्रामीण भागातील दि. ३१ डिसेंबर २०२० पूर्वी अस्तित्वात असलेले अनधिकृत भुखंड अनधिकृत भुखंडावरील बांधकाम नियमान्वित करण्यासाठी सहायक संचालक, नगर रचना जालना यांच्याकडील नोंदणीकृत परवानाधारक आर्किटेक्ट इंजिनियर यांच्यामार्फत प्रस्ताव दाखल करण्यास दि. ३० जून, २०२६ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली आहे.

जालना जिल्ह्यातील नागरिकांनी जालना जिल्ह्यातील महानगरपालिका, नगरपालिका व नगरपंचायत हद्दीअंतर्गत क्षेत्र वगळून उर्वरित ग्रामीण भागातील दि. ३१ डिसेंबर २०२० पूर्वी अस्तित्वात असलेले अनधिकृत भुखंड अनधिकृत भुखंडावरील बांधकाम नियमान्वित करण्यासाठी दिनांक ३० जुन, २०२६ पुर्वी विहीत कागदपत्रासह प्रस्ताव गुंठेवारी कक्ष, जिल्हाधिकारी कार्यालय जालना येथे दाखल करावे. तसेच उपरोक्त प्रमाणे मुदतीत प्रस्ताव दाखल केले नसल्यास किंवा गुंठेवारी नियमितीकरण प्रमाणपत्र न घेता अनाधिकृत भुखंडाची खरेदी-विक्री किंवा सदर झालेले बांधकाम हे अतिक्रमण समजण्यास येऊन उक्त अधिनियमातील कलम -७ (१) मधील तरतूदी अन्वये अशी अनधिकृत विनापरवाना बांधकामे पाडण्याची कार्यवाही करण्यात येईल, याची सर्व नागरिकांनी नोंद घ्यावी.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.